**प्रतिवादी क्र. १ तर्फे उलटतपास श्री. एस. एस. निकम वकील यांचे मार्फत.**

**४.** माझे जुनी अकरावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला या दाव्यातील वादी व प्रतिवादींची व्यक्तिशः माहिती नाही. या दाव्यात एक प्रतिवादी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला या दाव्यातील मिळकतींचे क्षेत्र व ठिकाण सांगता येत नाही.

५. मी जन्मापासून उत्तूर येथे राहतो. मला प्रतिवादीचे बस स्थानकाजवळ लॉटरीचे दुकान होते याबाबत माहिती नाही. मला वादी व प्रतिवादींच्या दोन गावांमध्ये मिळकती असल्याचे माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ने उत्तूर येथील घर मिळकत विकत घेतली आहे.

६. वादीचे सन १९८४ साली लग्न झालेले आहे. मला तिला संकेश्वर येथे दिल्याची माहिती नाही. मला तिच्या सासर बाबत माहिती नाही. वादीचा पती गडहिंग्लज येथे हॉटेलमध्ये काम करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या पतीला प्रतिवादी क्र. १ ने हॉटेलमध्ये कामाला लावले होते. प्रतिवादी क्र. १ उत्तूर येथील घरामध्ये राहत नाही.

७. मला वादी व प्रतिवादींमध्ये या दाव्या व्यतिरिक्त इतर दिवाणी वाद चालू असल्याची माहिती नाही. मला वादी व प्रतिवादींमध्ये असलेल्या आर्थिक देवाण-घेवाणची माहिती नाही. उत्तूर येथील त्यांचे घर दोन जाप्त्यांचे आहे. मला वादी व प्रतिवादी व्यतिरिक्त त्यांच्या आई-वडिल व बहिणींबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वादी व प्रतिवादींनी एकत्रीत खरेदी केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by
RAVI PANDURANG
THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - ०५.०८.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.